य
क्र.

## नवयुग चैतन्य किरण माला.

### आझाद हिंद कूचगीतें व क्रांतिगीतें

# सर र रा

कवि :— शशिकांत दत्त

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

REFBK-0006905
REFBK-0006905

य :— २ आणे

# आझाद हिंद कूचगीतें व क्रांतिगीतें

## सर २ रा.

( किरण ११ वा )

## शहिदांस स्मृति कुसुमांजलि

राग–ललत

नमुया अमरा, वीरजा, नरवरा भाइना ।
पुनीत या स्थाना ॥ धृ ॥
हिंद जननी पदीं देती प्राणा ।
करी स्फुरित मन जीवन जाणा ।
प्रेम सुवासित वाहू सुमना ।
सुजन या ॥१॥
साक्षी ठेवुनी नभिच्या तारा ।
करुं स्मरण मनीं शहिदा अमरा ।
वेड अजी शपथेला ।
सुजन या ॥२॥

——*——

[ किरण १२ वा ]

## सुभाषची प्राणाहुती

उठा बंधुनो करा जयंती मंगल दिन साजरा
भगिनिनों सुभाष दिन साजरा ।
पुण्यप्रतापी नेताजीच्या उपकारातें स्मरा ॥ धृ ॥
मातृभुमीच्या उदय गिरीवर चंद्र जन्म घेई
पराक्रमी बोस जन्म घेई ।
कलेकलेनें वाढत जाऊनि क्रांति तेज देई ॥१॥
सर्व सुखावरि लाथ मारुनि वीर फकिर बनला
चंद्रानं अतुल त्याग केला ।
परवशतेचे पाश तोडण्या निशिदिनी तळमळला ॥२॥
आझाद हिंदवी राज्य स्थापुनी सैन्य उभें केलें
क्रांतिचे वीर सज्ज झाले ।
स्वातंत्र्याचें युद्ध पुकारुनि आवाहन दिधलें ॥३॥
घोर युद्ध करुनिया इंग्रजा नाकीं नव आणिले
शत्रुला पिटाळूनि लाविलें ।
सहस्त्रावधी शिरकमलांनीं रणचंडिस पुजिलें ॥४॥

REFBK-00069

मृत्यूलाही दटावणारें जपान भेदरलें
इंग्रजा शरण कसें गेलें ।
दुर्दैवानें सूड घेतला महायुद्ध संपलें ॥५॥
स्वातंत्र्याचा लढा चालवा मृत्यूतेंही वरा
रेंसही कधिं नच मागें सरा ।
अखेरचा मम प्रणाम घ्या जयहिंद गर्जना करा ॥६॥
हिंददेविला मुक्त कराया अवतरला जगतीं
दाविली अतुल देशभक्ती ।
सुभाषचंद्रे निज प्राणाची ओवाळिली आरती ॥७॥

---*---

[ किरण १३ वा ]

## नवयुग

प्रिय भारतमातेचे तिरंगी निशाण
शिरसावंद्य करूं मजुरा ।
प्राणापलीकडे करुनी जतन
विजयी अमर त्या करा ॥ धृ ॥

या सकलभेद घालवा
हिंद मात्र एक व्हा ।
ध्वज रुधिरानं रंगवा
अमित तेज वाढवा ॥१॥

नविन युग सुरू करा
नविन दृष्टि स्वीकरा ।
नविन मार्ग आचरा
नविन साधन वापरा ॥२॥

—*—

[ किरण १४ वा ]

## स्वातंत्र्य शिखर

जाऊ चला । स्वातंत्र्य शिखरासी । गाठुनी विजयी होऊं ।
झेंडा तिरंगी लावू । क्रांतीगीता गावूं । या चला ऽचला
पाय उचला ॥ धृ ॥
जनहित रत व्हा । घालवाया अज्ञानाला ।
क्षण क्षण कण कण झिजवा ।
राष्ट्र यारे उठवा । मग रिपुजन, खल, फितुरा ।
एकेका झणिं दूर करा, गनिमासी मारा,

पथक उभारा ।
सज्ज तयारी करा हिंद जयहिंद बोला वीरया ॥१॥
स्वराज्य पथ हा दुर्गम जाणा ।
पदि पदि अरि नाना ।
कदम् कदम् पुढे पुढें चला ।
मार्गांतिल काटेकूटे काढा । भूमि तसु तसु लढवा ।
पदतलीं अघनघ तुडवा ।
सज्ज तयारी करा हिंद जयहिंद बोला वीर या ॥२॥
आत्मश्रद्धा सतत हृदयीं ठेवा ।
तनमन कार्मीं लावा ।
प्रिय जननीचा करुंया धावा । कुलदीप लावा ।
मिळवु यशाला ।
उच्च शिखरीं चढा हिंद जयहिंद बोला वीर या ॥३॥

———*———

[ किरण १५ वा ]

## आदर्श आझाद सैनिक व्हा

देशाचं स्वातंत्र्य लढूनी घ्यावया
जवान सारे झणिं सैनिक व्हा ना ॥ धृ ॥

लष्करी ध्याया शिक्षणा
आझाद शिबिरी या पोलादी बना ।
देश संजीवना द्या रुधीरा प्राणा ।
स्वातंत्र्याच्या भास्कराच्या घ्याना दर्शना ॥१॥
जगाबरोबर धावा ज्ञाना मिळवा ।
अनागसा सेवाया झिजवा कायेला ।
भारता माना देवता । रक्षाया ठेवा दक्षता ॥२॥

——*——

[ किरण १६ वा ]

## भारतमातेच्या चरणाशीं

जयमाते नमन तुला । करुनि गोड घे सेवेला ।
परवशता नाशाला । सबल करी मजला ॥ धृ ॥
स्फूर्ति दे लढण्याला । जननी दे वर मला ।
मंगला समयाला । साधा । सोनेरी संधि आलीया॥१॥
अतिखल दुष्मन् गोरा । निशिदिनी दुर्जन छळि तुजला ।
झट् पट् त्याचा घेईन मी बदला ॥

देई मज अभयाला । विनवित पद कमला ।

जय जय, जय जय जय जय, जय भारतमाता ॥२॥

सुंदरा, वसुंधरा । सुशीतला, ऋषीकुला ।

शोभना, सुफलिता । माता बहुरत्ना पुण्यपावना ॥३॥

———*———

[ किरण १७ वा ]

## भावी लढा

सुजन संधिकाल हा, लढा पुढेंचि राहिला ।

धुमसत अति अनल हा, ग्रहण वेध लागला ॥ धृ ॥

देश सकल हालवा । बळा सतत वाढवा ।

ही रिपुजन खल शकट धुरा । झुगारुनी रथ थांबवा ॥१॥

प्रति सरकार चालवा, हुकमत खरि गाजवा ।

भुमिगत जन सोडवा, परकि आंग्ल घालवा ॥२॥

जगात कीर्ति वाढवा । सुवर्ण दिवस दाखवा ।

हा निशिदिनी मनि ध्यास धरा । अविरत श्रम या करा ॥३॥

———*———

REFBK-0006905



[ किरण १८ वा ]

# झुंझार व्हा

क्रांति थडकली, शांति धडकली, आग भडकली,
भाई तय्यार, होइ तय्यार, झणिं तैय्यार ॥ धृ ॥

ही यादवी वाहवी रुधिर नदी अजि उघडी डोळे ।
अशि निद्रेमधिं तुम्हि वेळ न दवडा जागे व्हा तय्यार
नका भिऊं मुळीं मरणाला भाई कधी तरी मरणार ।
हुश्यार भाई तय्यार ॥१॥

स्वातंत्र्याच्या मार्गी काटे सावधान होउनि पद टाका ।
देशद्रोही फासेपारधी घालतील मागुनि बघ डाका ।
फंदफितुरिला समूळ गाडा प्रसंग पडला बहु बाका ।
हुश्यार भाई तय्यार ॥२॥

व्हा मृत्यू वरती स्वार । झेला छाती वरती वार ।
समर गाजवुनि अमर बना रे उघडा स्वर्गद्वार ।
झुंझार व्हा, झुंझार व्हा, झुंझार । भाई रणझुंझार ॥३॥

[ किरण १० वा ]

## स्वराज्याची मुहूर्तमेढ

सुभाषचंद्रानं केला जोहार गड्या केला जोहार
सशस्त्र क्रांतीचा केला चमत्कार । लइ मोठा चमत्कार ॥धृ

इंग्रजाच्या हाती दिली तुरीला
जर्मन राज्यात लपून गेला
मारून टाकलं हिटलराला
लष्करी सेनानी किताब दिला
वीर युद्धासि झाला तैय्यार । बेटा लइ हुश्यार ॥१॥

पाणबुडीनें जपानिं आला
हिरोहिटोनें सत्कार केला
सिंगापुरी बेटा धावूनि आला
जणुं स्वातंत्र्य देवीचा संचार झाला
वीरश्रीचा झाला अवतार ॥२॥

विजेच्या वेगानं प्रचार केला
मंत्रमुग्ध केलं साऱ्या लोकाला
पूर्व आशिया सारा पेटला
खडे करी देशभक्त सैन्याला
लढण्यांस केले हुश्यार ॥३॥

हिंदू मुसलमिन् एकत्र आला
हजारों स्त्रियाही सामील झाल्या
तरूण विद्यार्थी अधीर झाला
जाती जमातीचा भेद निमाला
हिंददेवीचा केला जयजयकार ॥४॥

अंदमान, निकोबार घेतलें
'शहीद' स्वराज्य नाम दिधलें
स्वराज्य मंदीर स्थापन केलें
तिरंगी निशाण डौलें डुललें
झाला स्वातंत्र्याचा साक्षात्कार
हिंदमातेचा केला जयजयकार ॥५॥

इंग्रजाविरुद्ध पुकारी युद्ध
इंफाळच्या झाला स्वारीस सिद्ध
गाजविलं रण शौर्य अगाध
हादरलं आंग्ल राज्य सबंध
परि दैवानं केला शिरी वार । विधी घटना अपार ॥६॥

जपान एकाकि शरण गेला
सुभाषचंद्राला संताप आला
धैर्याचा मेरु खरा नाहीं खचला
विमानानं टोजोकडे निघाला
दुष्ट काळानं केला स्वाहा:कार
सारा झाला अंध:कार ॥७॥

वीर नेताजी शहीद झाला
हजारों बंधूनीं प्राण अर्पीला
पवित्र रक्तानं झेंडा रंगला
भावी स्वराज्याचा पाया घातला
करा आझाद हिंद जयजयकार ॥८॥

६०५

[ किरण २० वा ]

## क्रांतीची मशाल

सकल हिंद जागवा कृषी मजूर मेळवा ।
मशाल दिव्य पेटवा क्रांति चिर करा ॥ धृ ॥
आंग्ल कपटनीति निपुण
साधि स्वजन फितुर जाण
कलह लाविला ।
यादवीस ऊत आणी देश भंगला ।
या बंधु या । या भगिनी या । घ्या सूड घ्या, सूड घ्या,
सूड घ्या । आंग्लानी घात मांडला ॥१॥
प्रिय सुभाष मारि हाक
दिव्य वाणी नीट ऐक
जबाब दे तिला ।
अधुरि क्रांति करी पुरी, जिंकी दिल्लीला ।
या वीर या । या मर्द या । व्हा सज्ज, सज्ज व्हा,
सज्ज व्हा । युद्धाचा वेध लागला ॥२॥
जय जय जय हिंद घोष
करुनि भेदी अंबरास
उंच ध्वज धरा ।
समरिं अरिस करुनि चीत देश उद्धरा ।
घ्या शपथ घ्या । द्या हृदय द्या । द्या, वित्त द्या, चित्त द्या
रक्त द्या । नेताजी हेंच गर्जला ॥३॥